**पुणे महानगरपालिका**

**जाहिरात प्रकटन**

समाज विकास विभाग अंतर्गत खालील अस्थायी पदावर ०६ महिन्यांकरीता करार पध्दतीने एकवट मानधनावर पदे भरावयाची आहेत.

गुणदान पद्धतीचा तक्ता व अटी व शर्ती बाबत माहिती पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरती भरती या सदरामध्ये उपलब्ध केलेल्या आहेत.

| **अ. क्र.** | **हुद्दा** | **एकूण पदांची संख्या** |
|---|---|---|
| १. | समुपदेशक | १९ |
| २. | समुहसंघटिका | ९० |
| ३. | कार्यालयीन सहाय्यक | २० |
| ४. | व्यवसायगट मुख्य मार्गदर्शक | १ |
| ५. | रिसोर्स पर्सन | ४ |
| ६. | विरंगुळा केंद्र समन्वयक | १० |
| ७. | सेवा केंद्र मुख्य समन्वयक | ६ |
| ८. | सेवा केंद्र समन्वयक | १४ |
| ९. | संगणक रिसोर्स पर्सन (कॉम्प्युटर हार्डवेअर ) | २ |
| १०. | स्वच्छता स्वयंसेवक | २१ |

Sd/-

**(नितीन उदास)**

**उप आयुक्त**

समाज विकास विभाग

पुणे महानगरपालिका

**पुणे महानगरपालिका**

**जाहिरात प्रकटन**

समाज विकास विभाग अंतर्गत खालील अस्थायी पदावर ०६ महिन्यांकरीता करार पध्दतीने एकवट मानधनावर पदे भरावयाची आहेत.

| अ. क्र. | हुद्दा | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकूण पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|
| १. | समुपदेशक | एम.एस.डब्ल्यु/एम.ए. (मानसशास्त्र)/कौन्सिलिंग डिप्लोमा | समुपदेशनाचा किमान १ वर्षाचा अनुभव. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील समुपदेशनाचा किमान १ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. | १९ | अजा–३,अज–१, विजाअ–१, भज क–१, विमाप्र–१, इमाव–२, खुला–७, एसईबीसी –३ |
| २. | समुहसंघटिका | पदवीधर/एम.एस.डब्ल्यू/ एम. ए. मानसशास्त्र अथवा समाजशास्त्र | वस्तीपातळीवर कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील किमान १ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | ९० | अजा–१२,अज–६, विजाअ–३, भज ब–२, भज क–३, भज ड–२,विमाप्र–२, इमाव–१७,खुला–२९, एसईबीसी –१४ |
| ३. | कार्यालयीन सहाय्यक | इ. १२ वी पास, मराठी टायपिंग शब्द प्रती मिनीट ३० किंवा इंग्रजी टायपिंग शब्द प्रती मिनीट ४०, एम.एस.सी.आय.टी. | कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील किमान २ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | २० | अजा–३,अज–१, भजक–१, भजब–१, विमाप्र–१, इमाव–३, खुला–७, एसईबीसी –३ |
| ४. | व्यवसायगट मुख्य मार्गदर्शक | एम. कॉम/एम.एस.डब्ल्यु/ डी. बी. एम. | बचतगटांना व्यवसाय निवडणे प्रकल्प अहवाल तयार करणे, मार्केट मिळवून देणे, इ. बाबतचा किमान ५ वर्षाचा अनुभव. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील किमान ५ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | १ | सर्वसाधारण – १ |
| ५. | रिसोर्स पर्सन | एम.कॉम/एम.एस.डब्ल्यु/ डी. बी.एम. | बचतगटांना व्यवसाय निवडणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, मार्केट मिळवून देणे इ. बाबतचा किमान २ वर्षाचा अनुभव. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील किमान २ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | ४ | अजा–१,अज–१, खुला–१, एसईबीसी –१ |
| ६. | विरंगुळा केंद्र समन्वयक | किमान १२ वी उत्तीर्ण | शासकीय किंवा सामाजिक संस्था यामध्ये किमान १ कामाचा अनुभव. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील किमान १ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | १० | अजा–१,अज–१, विजाअ–१, इमाव–२, खुला–३, एसईबीसी –२ |
| ७. | सेवा केंद्र मुख्य समन्वयक | इ. १० वी पास, पुणे मनपा व्यवसाय प्रशिक्षण संस्था/ शासनमान्य व्यवसाय प्रशिक्षण | ट्रेड कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव | ६ | अजा–१,अज–१, विजाअ–१, खुला–२, |

| अ. क्र. | हुद्दा | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकूण पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|
| | | संस्था यांचेकडील व्यावसायिक अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा (उदा. वायरमन, प्लंबर, गवंडीकाम, सुतारकाम इ. अभ्यासक्रम) | (वायरमन, प्लंबर, गवंडीकाम, सुतारकाम, इ.), पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | | एसईबीसी –१ |
| ८. | सेवा केंद्र समन्वयक | इ. ७ वी पास, पुणे मनपा व्यवसाय प्रशिक्षण संस्था/ शासनमान्य व्यवसाय प्रशिक्षण संस्था यांचेकडील व्यावसायिक अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा (उदा. वायरमन, प्लंबर, गवंडीकाम, सुतारकाम इ. अभ्यासक्रम) | ट्रेड कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव (वायरमन, प्लंबर, गवंडीकाम, सुतारकाम, इ.), समाज विकास विभागाकडील किमान २ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | १४ | अजा–२,अज–१, भजक–१, भजड–१, विमाप्र–१, इमाव–१, खुला–५, एसईबीसी –२ |
| ९. | संगणक रिसोर्स पर्सन (कॉम्प्युटर हार्डवेअर ) | इ. १२ वी पास, मान्यता प्राप्त संगणक संस्थेमधील संगणक हार्डवेअर /सॉफ्टवेअर विषयक कोर्स पुर्ण केलेला असावा. | **DB2** सॉफ्टवेअर वापरण्याचा किमान दोन वर्षाचा अनुभव, पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील किमान २ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | २ | अज–१, खुला–१ |
| १०. | स्वच्छता स्वयंसेवक | साक्षर/४ थी | कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील किमान १ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य | २१ | अजा–३,अज–२, विजाअ–१, भज क –१, विमाप्र–१, इमाव–३, खुला–७, एसईबीसी –३ |

**<u>अटी:–</u>**

१. वरील पदांवरील नेमणूका दरमहा एकवट मानधनावर करार पद्धतीने विहीत शैक्षणिक पात्रता, शैक्षणिक गुणवत्ता व समाज विकास विभागाकडील किंवा शासकीय व निमशासकीय विभागाकडील कामाचा अनुभव इ. च्या आधारे परिक्षण करून व गुणानुक्रमे निवड व प्रतिक्षा यादी तयार करून सहा महिने कालावधीसाठी केल्या जातील.

२. वरील सर्व जागांसाठी शारिरीकदृष्ट्या सक्षम असणारे व समाज विकास विभागाकडे कार्यरत असणाऱ्या उमेदवारांसाठी वय वर्षे ५८ पर्यंत व इतर उमेदवारांना शासन निर्णयानुसार मागासवर्गीय उमेदवारांसाठी वय वर्षे ४३ व खुल्या गटातील उमेदवारांसाठी वय वर्षे ३८ पर्यंत अर्ज करू शकतील.

३. छापील अर्ज दि. १४/०१/२०१९ व दि. १५/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं. ०५.०० पर्यंत कै. न. वि. गाडगीळ प्रशाला, शनिवार पेठ, पुणे–३० या ठिकाणी उपलब्ध राहतील.

४. वरील तक्त्यात नमूद शैक्षणिक पात्रता धारण करणे व अनुभव असणे आवश्यक आहे.

५. अर्ज करताना उमेदवारांची जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची स्वयं–साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. अर्जदार महिला विवाहित असल्यास शासनमान्य विवाह नोंदणी प्रमाणपत्राची अथवा शासनमान्य गॅजेटची (राजपत्र) स्वयं–साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

७. कार्यालयीन सहाय्यक या पदासाठी मराठी टायपिंग शब्द प्रती मिनीट ३० किंवा इंग्रजी टायपिंग शब्द प्रती मिनीट ४० उत्तीर्ण असल्याचे महाराष्ट्र स्टेट कौन्सिल ऑफ एक्झॅमिनेशन यांचे व महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन, मुंबई यांचे एम. एस. सी. आय. टी. कोर्स उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

८. गुणदान पद्धतीचा तक्ता व अटी व शर्ती बाबत माहिती पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरती भरती या सदरामध्ये उपलब्ध केलेल्या आहेत.

९. छापील अर्जासोबत एक पासपोर्ट आकाराचा फोटो, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक पात्रतेचे दाखले, अनुभवाचा दाखला व इतर आवश्यक कागदपत्रे साक्षांकित करून व पानवारी (पेजींग) करून कै. न. वि. गाडगीळ प्रशाला, शनिवार पेठ, पुणे–३० या ठिकाणी अर्जदाराने स्वतः उपस्थित राहून दि. १५/०१/२०१९ व दि. १६/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं. ०५.०० पर्यंत सादर करणेत यावा. टपालाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. उपरोक्त कागदपत्रांच्या मूळ प्रती निवड झालेल्या उमेदवारांनी रूजू होताना दाखविणे आवश्यक आहे. शासन निर्णयानुसार स्वयं–साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र सोबत कागदपत्रे साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे.

१०.अर्जामध्ये संपूर्ण माहिती दिलेली नसल्यास तसेच अर्जासोबत उपरोक्त नमूद दाखल्याच्या प्रती जोडलेल्या नसल्यास असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्जासोबत दिलेली माहिती व मूळ कागदपत्रांत काही दोष आढळल्यास अशा नेमणूका बाद करण्यात येतील.

११.निवड झालेल्या उमदेवारांना विहीत नमुन्यात करारनामा करून फक्त ०६ महिन्यांकरीता नेमणूक दिली जाईल. त्यानंतर करार संपल्यानंतर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्याकरिता पुन्हा पत्रव्यवहार केला जाणार नाही. उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.

१२.निवड झालेल्या उमेदवारास स्वखर्चाने करार करून द्यावा लागेल.

१३.निवड प्रक्रियेचे अंतिम अधिकार मा. अति. महापालिका आयुक्त (वि.), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

१४.अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५.सदर नियुक्त्या मानधन तत्वावर सहा महिने मुदतीकरीता होणार असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना मनपाच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर कायमस्वरूपी नियुक्तीकरीता हक्क सांगता येणार नाही. तसेच मनपा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ मिळण्यास ते पात्र ठरणार नाहीत.

१६.वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा. खातेप्रमुख यांना राहील.

१७.निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारक करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी रद्दबातल केली जाईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१८. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रूजू होण्यापूर्वी एका महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून भरावे लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

sd/-

**(नितीन उदास)**

**उप आयुक्त**

समाज विकास विभाग

पुणे महानगरपालिका

सर्व पदांसाठी (अ व ब)

अ.

| | इ. १० वी | इ. १२ वी | एम.एस.डब्ल्यु/एम.ए.(मानसशास्त्र)/कौन्सिलिंग डिप्लोमा/पदवीधर/एम.एस.डब्ल्यू/एम. ए. मानसशास्त्र अथवा समाजशास्त्र/एम. कॉम/एम.एस.डब्ल्यु/ डी. बी. एम. |
|---|---|---|---|
| **गुण** | **५** | **५** | **१०** |
| विशेष श्रेणी | ५ | ५ | १० |
| प्रथम श्रेणी | ४ | ४ | ८ |
| द्वितीय श्रेणी | ३ | ३ | ६ |
| उत्तीर्ण श्रेणी | २ | २ | ४ |

**किंवा** एक्सेल फॉरम्युलानुसार (= गुण X एकूण टक्केवारी / १००)

ब.

| | समाज विकास विभागाकडे काम केल्याचा अनुभव | शासकीय व निमशासकीय विभागाकडे काम केल्याचा अनुभव |
|---|---|---|
| **गुण** | **१०** | **५** |
| ० ते १ वर्ष पर्यंत | ४ | २ |
| १ वर्ष पुढील ते ५ वर्ष पर्यंत | ६ | ३ |
| ५ वर्ष पुढील ते १० वर्ष पर्यंत | ८ | ४ |
| १० वर्षाचे पुढे | १० | ५ |

क.

| **कार्यालयीन सहाय्यक या पदाकरीता** | | | | |
|---|---|---|---|---|
| **तांत्रिक कौशल्य पात्रता ((मराठी टायपिंग शब्द प्रती मिनीट ३० किंवा इंग्रजी टायपिंग शब्द प्रती मिनीट ४०))** | | | | **संगणक कौशल्य पात्रता (एम.एस. सी.आय.टी.)** |
| **गुण** | | **5** | | **5** |
| A - above 75% | | 5 | | 5 |
| B - 61 to 75% | | 4 | | 4 |
| C - 50 t0 60% | | 3 | | 3 |

ड.

| सेवा केंद्र मुख्य समन्वयक व सेवा केंद्र समन्वयक या पदाकरीता | |
|---|---|
| तांत्रिक कौशल्य पात्रता (ट्रेड कोर्स करीता) | गुण |
| A - above 75% | 10 |
| B - 61 to 75% | 8 |
| C - 50 t0 60% | 6 |

इ.

| संगणक रिसार्स पर्सन (कॉम्प्युटर हार्डवेअर) या पदाकरीता | | |
|---|---|---|
| संगणक कौशल्य पात्रता (मान्यता प्राप्त संगणक संस्थेमधील संगणक हार्डवेअर /सॉफ्टवेअर विषयक कोर्स) | | |
| गुण | | **10** |
| A - above 75% | | 10 |
| B - 61 to 75% | | 8 |
| C - 50 t0 60% | | 6 |

Sd/-
**(नितीन उदास)**
**उप आयुक्त**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका